# स्वयंसिध्दा 2018

**************************************************************

## विभागस्तरीय प्रदर्शन व विक्री

भंडारा,दि. 22 :- राष्ट्रीय ग्रामीण जिवनोन्नती अभियानांतर्गत विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर विभाग नागपूर व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद भंडारा यांच्या संयुक्त विद्‌यमाने स्वयंसहाय्यता समुहांमार्फत उत्पादित वस्तुंचे व कलाकृतींचे स्वयंसिध्दा 2018 विभागस्तरीय प्रदर्शन व विक्री 23 ते 27 फेब्रुवारी 2018 या कालावधीत दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे आयाजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उदघाटन 23 फेब्रुवारी 2018 रोजी संध्याकाळी 5 वाजता ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी भंडारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष रमेश डोंगरे राहणार आहेत.प्रमुख अतिथी म्हणून विभागीय आयुक्त अनूप कुमार, नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा निशा सावरकर, आमदार डॉ. परिणय फुके, चरण वाघमारे, राजेश काशीवार, रामचंद्र अवसरे, जिल्हाधिकारी सुहास दिवसे, राष्ट्रीय ग्रामीण जिवनोन्नती अभियानाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर विमला , भंडारा जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती धनेंद्र तुरकर, शिक्षण व

अर्थ सभापती रेखा ठाकरे, समाज कल्याण सभापती रेखा वासनिक , बांधकाम आरोग्य सभापती प्रेमदास वनवे उपस्थित राहणार आहे. विभागस्तरीय प्रदर्शनाचा समारोप 27 फेब्रुवारी 2018 रोजी संध्याकाळी 5 वाजता होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त अनूप कुमार राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून जिल्हाधिकारी सुहास दिवसे, नागपूर जिल्हा परिषदेचेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कादम्बरी बलकवडे, वर्धा मुख्य कार्यकारी अधिकारी अजय गुल्हाने , चंद्रपूर मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र पापळकर , गडचिरोली मुख्य कार्यकारी अधिकारी शंतनू गोयल, गोंदिया मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ . राजा दयानिधी उपस्थित राहणार आहे.

हे प्रदर्शन 23 ते 27 फेब्रुवारी 2018 पर्यंत सकाळी 10 ते रात्री 10 वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहणार असून याचा लाभ नागरिकांनी घ्यावा , असे आवाहन उपआयुक्त नागपूर विपुल जाधव, भंडारा मुख्य कार्यकारी अधिकारी मनोजकुमार सुर्यवंशी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा भंडाराच्या प्रकल्प संचालक मंजूषा ठवकर यांनी केले आहे .

श्री. मनोजकुमार सुर्यवंशी,

भाप्रसे, मुख्य कार्यकारी अधिकारी






शिल्पी सखी स्वयं सहायता समूह


६६ गांवकूस महीला स्वयंसहायता समुह
Shot on A1 Plus
Gionee Dual Camera


Shot on A1 Plus
Gionee Dual Camera


Shot on A1 Plus
Gionee Dual Camera